१) **एकाधिकार खरेदी योजना :-**

सन १९७६ च्या आदिवासी आर्थीक स्थिती सुधारणा कायद्यान्वये एकाधिकार शेतमाल खरेदी योजना सन १९७८ पासुन राबविण्यात येत आहे. सदर योजने अंतर्गत उपयोजना क्षेत्रातील निर्देशित अन्नधान्य, तेलबिया, वनमाल याची खरेदी करण्यात येत आहे. मात्र दिनांक ७ मार्च २००८ पासुन महाराष्ट्र शासनाने सदर योजना एक वर्षासाठी निलंबित केली आहे. मात्र या योजने अंतर्गत वनमाल डिंक, हिरडा, चारोळी व मोहफुले इ. वनमाल खरेदीस मुभा देण्यांत आली आहे.मागील तीन वर्षात झालेली एकाधिकार शेतीमाल खरेदीचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.न | हंगाम | एकाधिकार शेतीमाल खरेदी | |
|---|---|---|---|
| | | वजन | किंमत |
| १ | २००६.२००७ | १०८८२५.९४ | ११९४६९८४४.०० |
| २ | २००७.२००८ | ५०४५१.६२ | ८१०६०१८५.०० |
| ३ | २००८.२००९ | १०८.५१ | ४७४१२.०० |

२) **आधारभुत शेतीमाल खरेदी योजना :-** ( सन २०००.२००१ पासुन कार्यान्वीत)

ही केंद्र शासनाची योजना असुन महाराष्ट्र शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागा मार्फत राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत प्रादेशिक विभाग नंदुरबार करिता चालु वर्षी एकूण ४९ खरेदी केंद्रांना मंजुरी मिळाली असून त्याचा तपशिल येणे प्रमाणे ... नंदुरबार जिल्हा ३६, धुळे जिल्हा ९, जळगांव जिल्हा ४ , साधारणपणे ज्वारी , मका व भात खरेदी करण्यंत येत असुन त्याचे हमी भाव ज्वारी/मका रुपये ८४०/- व भात रुपये १०००/- व १०३०/- असे आहेत. मागील तीन वर्षात सदर योजने अंतर्गत खरेदी केलेल्या मालाचा तपशिल खालील प्रमाणे ...

| अ.न | हंगाम | खरेदी | |
|---|---|---|---|
| | | वजन | किंमत |
| १ | २००६.२००७ | ---- | ---- |
| २ | २००७.२००८ | १०३२३.८६ | ११३१२०७१.०० |
| ३ | २००८.२००९ | १८५८०.७४ | १५६२२३८०.०० |

१) **खावटी कर्ज वाटप योजना** :- ऐन पावसाळयात आदिवासी उपयोजना क्षेत्र व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील दारिद्र रेषेखालील आदिवासी लाभधारकांस खावटी कर्जाचे वाटप करण्यांत येते. आदिवासी कुटूंबास ४ युनिट पर्यत रु २०००/-, ५ ते ८ युनिटपर्यत रुपये ३०००/- व ८ युनिटचे वर कुंटुंबांना प्रत्येकी ४०००/- या दराने खावटी कर्ज वाटप करण्यांत येते. त्यात ७० टक्के माल रुपाने व ३० टक्के रोखीने कर्ज वाटप होते. सदर कर्जावर ३० टक्के सबसिडी देण्यांत येते. मागील तीन वर्षात झालेला खावटी कर्ज वाटपाचा तपशिल खालील प्रमाणे..

| अ.न | वर्ष | सभासद संख्या | एकूण रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २००५.०६ | ४३६६४ | १०७१५५४८४ | |
| २ | २००६.०७ | ५७८६७ | १६०७११००० | |
| ३ | २००७.०८ | ८१७०० | २५२४१२००० | |

चालु वषी एकूण ५४६०० लाभार्थीचे उदिष्ट देण्यांत आले होते. त्यात नंदुरबार जिल्हयासाठी ३६५००, धुळे जिल्हयासाठी ११३०० व जळगांव जिल्हयासाठी ६८०० उदिष्ट होते त्याप्रमाणे एकूण ५४६०० लाभार्थीना खावटी कर्जाचे वाटप करण्यांत आले असुन त्याची रक्कम रुपये ११६०६९१००/- आहे.

१) **गॅस युनिट पुरवठा योजना** :- सन २००५.०६ या वर्षापासुन दारिद्रय रेषेखालील आदिवासी कुटूंबांना केंद्र सरकारच्या विशेष सहाय्य योजने अंतर्गत तसेच राज्य शासनाच्या योजनेतुन स्वयपाकाचा संपुर्ण गॅस युनिट वाटपाची प्रक्रिया सुरु आहे.

आदिम जमातीच्या तसेच विधवा, पारितक्त्या कुटूंबांना प्राधान्य देण्यांत येते. स्थानिक पातळीवरील सरकारी तेल कंपन्यांचे वितरकाकडून आदिवासी विकास महामंडळामार्फत गॅस सिलेंडर पुरवठा करण्यांत येतो.

सन २००५.०६ व २००६.०७ या वर्षात एकूण २६३७७ दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना लाभ देण्यांचे उदिष्ट देण्यात आले त्यापैकी १३८८० लाभार्थीची यादी मंजुर असुन प्रत्यक्षात वाटप १०५६४ लाभार्थीना वाटप झाले आहे. उर्वरित ३४१६ लाभार्थीना वाटप बाकी असून वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

सन २००७.०८ व २००८.०९ साठी अद्याप प्रकल्प कार्यालयाकडून गॅस वाटप लाभार्थीची यादी मंजुर झालेली नाही. त्यामुळे गॅस वाटप नाहीत.

२) **वीजपंप / तेलपंप योजना** :- आदिवासी शेतक-यांना कमीत कमी १ा एकूर ते १५ एकर जमीन धारक लाभार्थीना वीजपंप व तेलपंप वाटप करण्यांत येतात. त्यासाठी पाण्याचे साधन विहिर, नदी, नाला, धरण, तलाव इ. असणे आवश्यक आहे. सन १९७३.७४ ते २००८.०९ पर्यत मंजुर व वाटप विजपंपाचा तपशिल खालील प्रमाणे..

| अ.न | हंगाम | मंजुर | | वाटप | | बाकी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | विजपंप | तेलपंप | विजपंप | तेलपंप | विजपंप | तेलपंप |
| १ | १९७३.७४ ते २००८.०९ पर्यत | १८३५७ | १३४५६ | १८३४५ | ११७७२ | १२ | १७४४ |

३) **व्दार वितरण योजना :-** राज्यात सन १९९३ पासुन व्दार वितरण योजना सुरु करण्यांत आली आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्था मजबुत करण्याच्या उद्येशाने केंद्रीय अर्थ साहाय्यामधुन खरेदी केलेल्या वाहनातुन आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रातील शासकिय गोदामापासुन रास्त भाव दुकानापर्यत अन्नधान्याची वाहतुक करण्यासाठी कार्यान्वय यंत्रणा म्हणून आदिवासी विकास महामंडळाची निवड करण्यांत आली आहे. सदर योजना शासनाने दिलेल्या निर्देशानुसार नंदुरबार, धुळे व जळगांव जिल्हयातील रेशन माल दुकानाचा माल वाहतुकीसाठी २६ वाहने दिलेली आहेत. त्यातील २० वाहने नादुरुस्त असल्याने बंद आहेत पर्यायी वाहने लावून वाहतुक केली जाते. वाहतुक मालाचा तपशिल खालील प्रमाणे ..

| अ.न | हंगाम | वाहतुक माल वजन क्विंटल | वाहतुक बील रुपये (लाखात) |
|---|---|---|---|
| १ | २००६.०७ | ७८७५११.०० | ११७.५५ |
| २ | २००७.०८ | ७६२४०६.०० | ११३.६८ |
| ३ | २००८.०९ | ७०६१२५.०० | १०५.७३ |

७) **शासकिय आश्रम शाळा व वसतीगृहांना अन्नधान्य ,कडधान्य व किराणा माल पुरवठा**.

| प्रकल्पाचे नांव | शासकिय आश्रम शाळा संख्या | वसतीगृह संख्या |
|---|---|---|
| नंदुरबार | ४५ | ५८ |
| तळोदा | ५२ | २३ |
| यावल | १८ | १६ |
| एकूण | ११५ | ९७ |

उपरोक्त शासकिय आश्रम शाळा व वसतीगृह यांना अन्नधान्य किराणा मालाचा पुरवठा प्रकल्प कार्यालयाने दिलेल्या मागणी प्रमाणे व मा. आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांनी मे.भारतीय राष्ट्रीय उपभोक्ता सहकारी संघ लि. मुंबई यांना दिलेल्या आदेशाप्रमाणे या

कार्यालयाअंतर्गत गोदामास माल प्राप्त होतो. सदर माल मा.आयुक्त यांनी प्रमाणित केलेल्या नमुन्या प्रमाणे व प्रकल्प अधिकारी यांनी मालाच्या दर्जाबाबत खात्री करुन मान्यतेनंतर महामंडळाकडुन पुरवठा करण्यांत येतो .

सदर माल पुरवठयापोटी आदिवासी विकास महामंडळास मा.आयुक्त कार्यालयाकडुन पुरवठा मालाच्या किंमतीच्या ३ टक्के सेवा शुल्क दिले जाते.